THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 16TH FEBRUARY 1893.

*☞ Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### लेजिस्लेटिव्ह डिपार्टमेंट.

हिंदुस्तानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं दिलेला आक्ट आली जनाब गव्हर्नर जनरल यांनीं तारीख २० माहे जानेवारी सन १८९३ रोजीं मंजूर केला तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं यावरून प्रसिद्ध केला असे :—

## सन १८९३ चा आक्ट नंबर १.

**सन १८९१चा पेढीवाल्यांच्या वह्या पुराव्यास घेण्याचा आक्ट याचे ठराव पोस्ट ऑफिस सेव्हिंग्स ब्यांकींच्या व मनीआर्डर आफिसांच्या वह्यांस लागू करण्यासाठीं आक्टाचा मसुदा.**

ज्या अर्थीं सन १८९१ चा पेढीवाल्यांच्या वह्या पुराव्यास घेण्याचा आक्ट याचे ठराव पोस्ट ऑफिसाच्या सेव्हिंग्स ब्यांकींच्या व मनीआर्डर ऑफिसांच्या वह्यांना लागू करणें योग्य आहे; त्या अर्थीं खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे :—

१. (१) या आक्टास सन १८९३ चा पेढीवाल्यांच्या वह्या पुराव्यास घेण्याचा आक्ट असें ह्मणावें; आणि

लहान सरनामा व सुरुवात.

(२) तो एकदम अमलांत येईल असें समजावें.

२. सदर्हू सन १८९१चा पेढीवाल्यांच्या वह्या पुराव्यास घेण्याचा आक्ट याच्या २ऱ्या कलमाच्या (२) ऱ्या पोट-कलमाची रकम (ब) हिच्यानंतर खालीं दिलेली रकम दाखल करावी, ह्मणजे :—

सन १८९१ च्या १८ व्या आक्टाचें कलम २, पोट-कलम (२) यांतील "पेढी" व "पेढीवाला" या शब्दांचे व्याख्येंत ज्यास्त मजकूर दाखल करणें.

" (क) कोणतेंहि पोस्ट ऑफिसचें सेव्हिंग्स ब्यांक किंवा मनी आर्डर ऑफिस.

(सही.) जे. एम्. म्याकफर्सन,
ऑफिशिएटिंग सेक्रेटरी निसबत हिंदुस्तान सरकार.

(True Translation.)

Y. M. KELKAR,
Oriental Translator to Government.



BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.